*Open Access, Peer Reviewed, Research Journal*
©JES Printer and Publisher
Print & Online available on https://jesbulletin.in
**Research Article**

# माणसातला माणूस जागवण्याची वेळ...

**प्रा. डॉ. बी. जी. श्रीरामे**
मराठी विभाग,
जे. ई. एस. महाविद्यालय,
जालना.
Email: shriramebaburao@gmail.com

एकविसाव्या शतकावरून मागे जाऊन मानवाच्या उत्पत्तीचा काळ शोधताना आपणास अनेक शतके मागे जावे लागते. रानावनात कंदमुळे खाऊन जगणाऱ्या आदी मानवापासून खऱ्यार्थाने मानवाचा काळ पुढे सरकत गेला. तदनंतर तो इतका सरकत गेला की,तो हळूहळू भौतिक संस्कृतीच्या दिशेने अधिकचा पुढे येत गेला. इतका की, तो आकाशातून उंच उडू लागला. समुद्रातून फिरू लागला. तसेच सृष्टीतल्या सात खंडातून मुक्तपणे विहार करू लागला. पण एका बाजूला माणूस मात्र आपल्यातील माणुसकिचा कप्पा रिकामा करून जगू लागला. भौतिक संस्कृतीच्या मागे धावताना अभौतिक संस्कृतीचा वारसा विसरून गेला. त्यात नीतिमत्ता गमावून बसला. म्हणून इथे संस्कृतीचा गावचं वेगळा झाला. आई-वडील गेल्यावर मालमत्तेचा वारसदार म्हणून शिक्कंमोर्तब करण्यात आनंद सारा.आई-वडिलांची सेवा करण्याच्या वेळेला हा कोणत्या शहरात कोणत्या मजल्यात राहत होता हे कसलेच आई-वडिलांना माहीत नसावे, म्हणजे या देशातील महान भारतीय संस्कृती जिचा जगाला हेवा वाटतो. तो हेवा आज वाटण्याचे प्रमाण झपाट्याने कमी होत चालल्याची खंत इथे कोणालाच वाटत नाही. याकडे फार गांभिर्याने पाहण्याची आज गरज वाटते.

'श्यामची आई' मधील 'थोर अश्रू' या संस्कार कथेतून श्यामला श्यामची आई म्हणते "श्याम! पायाला घाण लागू नये म्हणून जपतोस! तसाच मनाला घाण लागू नये म्हणून जप हो. देवाला सांग शुद्ध बुद्धी दे म्हणून."१" असी त्याची भारतीय संस्कृतीतील आई सांगते. हा मानवाच्या मन स्वच्छतेचा संदेश आजच्या काळात कुठे बसवावा हाच प्रश्न उरतो.

कारण अनेक प्रांत, अनेक भाषा, अनेक धर्म, अनेक जाती, अनेक चालीरिती, अनेक वेशभूषा, केशभूषा, या सर्वांनी बनलेला व आधुनिक स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या गुणांने संपन्न असलेला किंवा अलीकडे जास्तच संपन्न झालेल्या आपल्या भारत देशाकडे लक्ष केंद्रित केल्यास आज भारताचे चित्र विकोपाला येऊन पोहोचल्याचे आपणास दिसून येते. कारण आज राजकारण, धर्मकारण व समाजकारण हे सर्वकाही जास्तीत जास्त स्वार्थापोटी चालल्याचे दिसून येते.

आज आपण जर निसर्गाकडे एक दृष्टिक्षेप टाकल्यास निसर्ग आपणास कितीप्रकारची नैसर्गिक साधनसामुग्री अगदी मोफत पुरवतो. त्याच्या मोबदल्यात आपण त्याची परतफेड तर करतच नाही, पण त्यातही जर पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आज महाराष्ट्र सरकारने अनेक झाडे लावण्याचा संकल्प केला असेल तर त्यात आपण किती प्रामाणिकपणे झाडे लावतोत, हे दरवर्षी जुन्याच खड्ड्यात एखादेचं झाड लावून फोटो घेऊन, प्रसिद्धीला देणारे लोकच ठरवतील. म्हणून या समाजात "सारे काही फोटोसाठी" असेचं चालल्याचे लक्षात येते. प्रत्येकाला वाटते आपण कसलीच मेहनत न करता सर्वत्र आपलेच नाव आपलाच फोटो लागावा. ही निती फारच घातक आहे. कारण नम्र माणूस 'खरे ते माझे' म्हणत असतो. पण आज त्याच्या उलट 'माझे ते खरे' म्हणण्यातच आजचा माणूस व्यस्त झाला आहे. याचसाठी आज समाजाला सत्य कशाला म्हणावं हे छाती फोडून सांगण्याची वेळ आलेली आहे. कारण समाजाला सत्याची व्याख्या उलगडून सांगणारा फक्त आणि फक्त निष्णात कलेच्या कसोटीवर उतरणारा कलावंतच उरलेला दिसतो. कारण तो आपल्या कलेच्या माध्यमातून माझे ते खरे असे कधीच मांडत नाही, तर तो विश्वमान्य ते खरे असेचं आपल्या कलेतून मांडत असतो. म्हणून एके ठिकाणी संस्कृतीच्या स्वरूपाची चर्चा करताना डॉ. सुधीर रसाळ म्हणतात "विशिष्ट भूभागावर सातत्याने राहणारा मानव समूह त्या भूभागाच्या प्राकृतिक गुणधर्मावर आधारित अशी संस्कृती निर्माण करतो. या भूभागाची प्राकृतिक रचना, जमीन, पर्वत, नद्या, जलाशय, हवामान, ऋतू, वनस्पतीचे आणि प्राण्यांचे जग, येथील नैसर्गिक- प्राकृतिक संपत्ती आणि पीकपाणी, या सर्वांमधून तेथील मानव समूहाच्या जीवन पद्धतीची पायाभूत आणि प्राथमिक चौकट निश्चित होते. ही आपली जीवनपद्धती सुरळीत, सुरक्षित आणि सुखदायी बनवण्यासाठी ती घडत असतानाच, तिचे नियंत्रण- नियमन करणाऱ्या मूल्यांची आणि श्रद्धांची एक व्यवस्था मानव समूह निर्माण करतो. या व्यवस्थांमधून त्या मानव समूहाच्या संवेदनशीलतेची आणि जीवनविषयक दृष्टिकोनाची एक व्यापक चौकट निश्चित झालेली असते. या व्यापक चौकटीत, तिच्याशी सुसंगत अशा संवेदनशीलतेच्या आणि जीवनविषयक दृष्टिकोनाच्या अनेक व्यवस्था असतात आणि नवनव्या व्यवस्था संभवूही शकतात. भौगोलिक गुणधर्म, जीवनपद्धती, मूल्यांच्या, श्रद्धांच्या, संवेदनशीलतेच्या आणि जीवनविषयक दृष्टिकोनाच्या व्यवस्था, यामध्ये एक जैविक स्वरूपाचे नाते प्रस्थापित होऊन त्या संस्कृतीची महाव्यवस्था सिद्ध झालेली असते. अशा व्यापक स्वरूपाच्या महाव्यवस्थेला आपण 'संस्कृती' म्हणतो."२" ही भारतीय संस्कृती सर्व कलांवर उभी आहे.

मोबाईलमुळे संदेशनाची सोय झाली आहे. हे मान्य आहे. तर दुसरीकडे मात्र लुचाडांसाठी ते एक खोट बोलण्याचे महत्त्वाचे साधन होऊन बसले आहे. कारण त्याचा वापर योग्य व उपयुक्त कामे करून आपला विकास वेगवान करण्यासाठी करून घेतला पाहिजे. पण आजचे विशेषत: तरून त्यांचा उपयोग किती योग्य कामासाठी करतात याचा विचार न केलेलाच बरा.

विनोबा भावे आपल्या एका निबंधात सांगतात "जगाला प्रकाश देणारा एवढा मोठा सूर्य तुमच्या, आमच्या सारख्या सामान्य माणसांची सेवा करण्यासाठी आपल्या दारावर येऊन तिष्ठत थांबलेला असतो. तुम्ही सकाळी उठून अर्धेदार काढलात तर अर्धाच प्रकाश आत येत असतो. जर आपण पूर्ण दार काढलात तर पूर्ण प्रकाश घरात येत असतो" म्हणून आपल्या अज्ञेनुसार (ज्याचं

जगावर राज्य आहे.) असा तो सूर्य आपली सेवा करण्यास तयार असतो. याच्या मोबदल्यात आपण काय देतो हे स्वतःला विचारण्याची आता वेळ आलेली आहे.

या उलट आपण सूर्याच्या प्रकाशात वाढणारी, आपणास सावली व प्राणवायू देणारी झाडे तोडून जंगलेची जंगले साफ करतोत.आजच्याकाळात माणसाची मानसिकता लक्षात घेण्यासाठी आपण एक उदाहरण घेऊ. "राजाला यज्ञासाठी पुष्कळ दुधाची जरुरी होती.त्याने शहराच्या मध्यभागी एक भले मोठे भांडे उभे करून हर एकाने एक एक शेर दूध त्यात ओतावे अशी दवंडी पिटवून दिली. एकाने विचार केला, "इतक्यात सगळ्या लोकांचे
दूध येणार आहे त्यात मी शेरभर पाणी टाकले म्हणून काय होणार आहे?" त्याने शहरभर पाणी टाकले. दुसऱ्यालाही तोच विचार सुचला. त्यानेही तसेच केले. हाच कार्यक्रम सर्वांस पसंत पडून ते भांडे शुद्ध गंगाजळाने तुडुंब भरून गेले."३" म्हणून आज माणसं प्रथम आपण माणूस आहोत; हे मात्र विसरून स्वार्थाला कुरवाळत आहेत. हे चित्र जर समाजातून नष्ट करावयाचे असेल तर प्रत्येकांने आपाल्यातला माणूस जागवण्याची वेळ आता नक्कीच आली आहे. या पार्श्वभूमीवर एके ठिकाणी सुधीर रसाळ म्हणतात ते या ठिकाणी सांगावेसे वाटते. "यादवकाळापासून ते पेशवाई अखेरपर्यंत आपल्या वांग्मयीन संस्कृतीत यांपैकी अनेक वैशिष्ट्य टिकून होती. त्यामुळेच वारकऱ्यांचे, महानुभावीयांचे, शाहिरांचे खास प्रकारचे, स्वतःचा स्वतःचा चेहरामोहरा असलेले वाङ्मय निर्माण झाले. या परंपरेत ज्ञानोबा- तुकोबा हे महान लेखक निर्माण होऊ शकले. परंतु आपल्यावर परकी सत्ता स्थापन झाल्यावर आपण तिच्यापूढे पूर्ण शरणागती पत्करली. त्यांच्या संस्कृतीला पालकत्वाचे स्थान देऊन आपल्याकडे आपखुशीने पाल्यत्व घेतले. केवळ राजकीय स्वातंत्र्य मिळाल्याने जीवनाच्या सर्वच क्षेत्रात स्वातंत्र्य प्राप्त होत नसते; या तथ्याकडे आपले दुर्लक्ष झाले. आपल्या सांस्कृतिक स्वातंत्र्यासाठी आपण स्वतंत्रपणे लढे देणे आवश्यक होते. परंतु राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपण आपली संस्कृतिक गुलामगिरी अधिक पक्की करीत गेलो."४" म्हणून अशा पद्धतीचे एकूणच वातावरण आपल्या देशात निर्माण झाले असावे, यावर मला असे म्हणावेसे वाटते. लाजाळूचे झाड
आता...
माणसाच्या स्पर्शाने...
लाजत नाही
माणसात माणूस...
राहिला नाही
तुर्तास इतकेच.

**संदर्भग्रंथ**

१) श्यामची आई  साने गुरुजी.  पुणे विद्यार्थी गृहप्रकाशन . पृ.३२
२) वाग्मयीन संस्कृती  डॉ.सुधीर रसाळ  मौज प्रकाशन ...पृ०२.....
३) मधुकर. विनोबा भावे  ग्राम-सेवा-मंडळ, नालवाडी, वर्धा.  पृ.२४
४) वांग्मय संस्कृती  डॉ.सुधीर रसाळ  मौज प्रकाशन.  पृ.२१